

छावणी पोलीस प्रशासनाकडून अवैध नशा व्यवसायांवर मोठी कारवाई

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–15 ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. सोमवार, 15 डिसेंबर 2025 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

## जवळपास ७०% शिक्षक 'लाडावलेले' ; संप करणाऱ्या शिक्षकांवर निलंबनाची मागणी - प्रशांत बंब

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

राज्यात सुरू असलेल्या शिक्षकांच्या संपावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत प्रशांत बंब यांनी जवळपास ७० टक्के शिक्षक हे लाडावलेले झाले आहेत, असा गंभीर दावा केला आहे. संपात सहभागी झालेल्या शिक्षकांवर केवळ वेतन कपात न करता थेट निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



प्रशांत बंब यांनी म्हटले की, शिक्षकांचा हा संप विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर थेट परिणाम करणारा आहे. शाळा बंद राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून परीक्षा, अभ्यासक्रम आणि संपूर्ण शैक्षणिक वेळापत्रक कोलमडले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात घालणाऱ्या अशा आंदोलनाला सहानुभूती दाखवता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच त्यांनी शिक्षकांच्या मागील वर्तणुकीवरही प्रश्न उपस्थित केले. हा पहिलाच प्रसंग नाही. याआधीही अशाच स्वरूपाचे संप, कामबंद आंदोलन आणि गैरहजेरीचे प्रकार झाले आहेत. त्यांचा मागील रेकॉर्ड पाहता केवळ वेतन कपात ही फारच सौम्य कारवाई ठरेल, असे बंब म्हणाले. त्यामुळे शिस्तभंगाच्या नियमांनुसार निलंबनासारखी कठोर कारवाई आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान, शिक्षक संघटनांनी या आरोपांना तीव्र विरोध केला आहे. त्यांनी सांगितले की, आपला संप हा प्रलंबित मागण्यांसाठी असून शासनाने वारंवार दुर्लक्ष केल्यामुळेच आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची तयारीही संघटनांनी दर्शवली आहे.

या परस्परविरोधी भूमिकांमुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात तणाव निर्माण झाला असून शासन आता कोणती भूमिका घेते आणि शिक्षकांच्या संपावर कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभाग 'खाते'

## रस्ते, कामे आणि बिले संशयाच्या भोवऱ्यात; संदीप देशपांडेंचे गंभीर आरोप

### राज्यात सर्वच ठिकाणी असे प्रकार होत असल्याचा संशय?

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा दावा करत सामाजिक कार्यकर्ते संदीप देशपांडे यांनी व्हिडीओसह गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या या व्हिडीओंमुळे राज्याच्या प्रशासकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून या प्रकरणाची सखोल आणि स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

देशपांडे यांनी त्यांच्या व्हिडीओमध्ये रस्ते बांधकाम व दुरुस्तीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून कागदोपत्री मात्र उच्च दर्जाच्या कामाचे दाखले देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. काही ठिकाणी कामे अपूर्ण असतानाही ती पूर्ण झाल्याचे दाखवून कोट्यवधी रुपयांची बिले काढण्यात आल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.

**भ्रष्टाचाराच्या मुद्यावर आमदार गप्प**

तसेच निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत, काही ठेकेदारांना नियमबाह्य पद्धतीने कामे देण्यात आल्याचे देशपांडे यांनी म्हटले आहे. या कथित गैरप्रकारांमुळे सरकारी तिजोरीचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून संबंधित कागदपत्रे व स्थळावरील व्हिडीओ हे पुरावे म्हणून सादर केल्याचेही त्यांनी सांगितले.

(PWD) खात्यातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सामान्य करदात्यांच्या पैशांचा असा गैरवापर होत असेल तर तो अत्यंत गंभीर विषय आहे, असे देशपांडे यांनी म्हटले आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. दरम्यान, या आरोपांवर झथऊ विभागाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, विभागीय पातळीवर प्राथमिक माहिती घेतली जात असल्याचे सूत्रांकडून समजते. आरोपांची सत्यता तपासल्यानंतरच पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल, असेही संकेत मिळत आहेत.

या प्रकरणामुळे (PWD) मधील कामकाज, विकासकामांची गुणवत्ता आणि प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून नागरिक, सामाजिक संघटना आणि राजकीय वतुर्ळाचे या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. पुढील चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असणार आहे.

### भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे

छत्रपती संभाजीनगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागात (PWD) भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर वाढल्याचा गंभीर आरोप होत असून भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. कंत्राटदारांच्या नावाखाली काही राजकीय नेत्यांनी थेट शिरकाव केल्यामुळेच विभागातील भ्रष्टाचार अधिकच बोकाळल्याचा आरोप केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रस्ते, इमारत बांधकामे आणि दुरुस्तीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असताना कागदोपत्री मात्र दर्जेदार काम दाखवून कोट्यवधी रुपयांची बिले मंजूर केली जात असल्याचे आरोप आहेत. काही कामे अपूर्ण असतानाही ती पूर्ण झाल्याचे दाखवून निधी काढण्यात आल्याचे दावेही पुढे येत आहेत.

या कथित गैरप्रकारांमध्ये कंत्राटदार, अधिकारी आणि राजकीय हस्तक्षेप यांचे संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राजकीय दबावामुळे नियम डावलले जात असून पारदर्शकतेचा पूर्ण अभाव आहे, असा आरोप संबंधितांनी केला आहे. त्यामुळे प्रामाणिक अधिकाऱ्यांवरही दबाव येत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या प्रकरणी सखोल आणि स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. झथऊ प्रशासनाकडून मात्र या आरोपांवर अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नसून प्राथमिक चौकशी सुरू असल्याचे सूत्रांकडून समजते.या आरोपांमुळे छत्रपती संभाजीनगरातील विकासकामांची गुणवत्ता, सरकारी निधीचा वापर आणि प्रशासकीय पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून पुढील चौकशीतून नेमके काय उघड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नेहमीच या विभागासमोर कुणी ना कुणी उपोषणास बसलेले असतेच.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांना रोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण द्यावे -जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी बाधवाच्या कुटुंबातील मुला, मुलींना किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यताविभागाची जिल्हा कार्यकारणी समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा कौशल्य कौशल्य, रोजगार उद्योजकता विभागाचे सहाय्यकआयुक्त राजू वाकोडे, शिक्षणाधिकारी माध्यमिकच्या अश्विनी लाठकर, शासकीय तंत्रनिकेतनचे उपसंचालक प्रदीप दुर्गे,प्राचार्य. अभिजीत आलटे,,सिपेट प्रशिक्षण संस्थाचे व्यवस्थापक आर जीवन राम, , इंडो जर्मन टूल्स कंपनी व्यवस्थापक जयेश बागुल, छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयाचे कमलाकर कदम, अटल इंक्युबेशन सेंटरशेख नवीद, देवगिरी शासकीय तंत्र निकेतन संस्था एस, जी. गोस्वामी यासह विविध प्रशिक्षण संस्थांच्या समन्वयक आणि प्राचार्य यांची उपस्थिती होती.

जिल्हास्तरीय किमान कौशल विकास कार्यक्रम ंतर्गत देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमामध्ये जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील तरुण, तरुणींना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करावे. तसेच जिल्ह्यातील सैन्य दलातील निवृत्त झालेल्या माजी सैनिक आणि त्यांच्या पाल्यांनाही प्रशिक्षणास प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज बैठकीत दिले. कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नावीन्यता जिल्हा कार्यकारणी समितीच्या अंतर्गत असणाऱ्या विविध प्रशिक्षण संस्था ,शासकीय संस्था, अर्ध शासकीय आणि खाजगी कंपन्यांच्या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण व्हावे. आगामी काळातील पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्यांची गुंतवणूक आणि निर्मिती जिल्ह्यामध्ये होत असून या कंपन्यांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देऊन जिल्ह्याचा रोजगार निर्मितीमधील सहभाग मोठ्या प्रमाणात असावा यासाठीचे प्रशिक्षण वर्ग आणि त्याचे आयोजन , नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज संबंधित प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा कौशल्य विकास विभागाला दिले.

जिल्हातील कौशल्य विकासाच्या अंतर्गत एकत्रित रोजगार निर्मितीसाठी सर्व संस्थाने समन्वयातून विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे नियोजन करावे. ज्या प्रशिक्षणार्थींची जास्त गरज औद्योगिक क्षेत्रांना असते त्याला प्राधान्य देण्यात यावे .कौशल्य विकास योजना अंतर्गत जागतिक बँकेचा दक्ष हा एक प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्येही मोठ्या प्रमाणात तरुणांनी सहभाग घ्यावा. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ,प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, किमान कौशल्य विकास कार्यक्रम, आर्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र याच्या अंतर्गतही तरुणांना प्रशिक्षण दिले जाते. शासकीय तंत्रनिकेतन आणि विविध कंपन्यांचे स्वायत्त असलेल्या प्रशिक्षण संस्थांमधून तरुणांना मोठ्या प्रमाणात विविध कौशल्य आधारित प्रशिक्षणाची निवड आणि संधी उपलब्ध करून दिली जाते. यामध्ये गरजू आणि बेरोजगार तरुण तरुणींना प्रशिक्षण देण्यात यावे. जिल्ह्यामध्ये या सर्व संस्थांनी अत्यावश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी असलेले अभ्यासक्रम आगामी पाच वर्षाच्या अनुषंगाने निवड करून तयार करावेत .व यामध्ये आवश्यक असल्यास काही नवीन अभ्यासक्रमाचा ही समावेश करावा असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

# सिंहावलोकनः नववर्ष संकल्पनांचे

**वर्ष नवे,** हर्ष नवे म्हणत प्रारंभी अर्थात नववर्ष दिनी आखलेल्या योजना आणि केलेले संकल्प किती प्रत्यक्षात आले याचे सिंहावलोकन करण्याचा काळ म्हणजे सरता डिसेंबर महिनाः डिसेंबर महिन्याचा पहिला आठवडा देखील आता संपला आहे. त्यामुळे हे काम करायलाच हवे आणि सिंहावलोकन करताना स्वत:ला आरसा दाखवावाः जवळपास केलेले संकल्प हे केवळ नव्याचे ९ दिवस म्हणत वर्षाच्या दुसऱ्या महिन्यापर्यंत टिकले नाही हे जाणवेल. ज्यांनी नेटाने संकल्प केले त्यांचे यानिमित्त विशेष अभिनंदन देखील करावेच लागेल.

बोलायला पैसे थोडेच लागतात म्हणत मोठ्या प्रमाणात संकल्प केले जातात ही आपली मानसिकता आहे. मात्र अंथरुण पाहून पाय पसरावेत या उक्तीप्रमाणे हे संकल्प होत नाही, म्हणून हे संकल्प टिकत नाहीत. आपल्या आरोग्यासाठी किमान रोज १० हजार पावलं चालायची हा संकल्प आणि याला कारण अर्थातच प्रत्येकाच्या हातात आलेले 'स्मार्ट वॉच' आणि मोबाईल होय. यात आपण चाललेली पावलं मोजली जातात आणि त्याचा महिनावार आलेख ही जपला जातो. प्रत्यक्षात उद्दीष्ट किमान २ हजार पावलं असे सुरू करून पुढील प्रत्येक महिन्यात १ हजार पावलं वाढवली तर हे उद्दीष्ट आवाक्यात येऊ शकते.



– प्रशांत दैठणकर

कोरोना नंतर आलेल्या 'न्यू नॉर्मल' ने आरोग्याचे खूप महत्व आहे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला झाली. यामुळे मोठ्या प्रमाणावर जागरूकता आली असली तरी मनुष्य स्वभावाचा स्थायी भाव बदलत नाही. परिणामी 'जूने जाऊ द्या मरणालागुनी' या उक्तीचा प्रत्यय येवून सर्वांचे न्यू नॉर्मल आता पुन्हा पहिले पाढे पंचावन्न या उक्तीवर येत आपण जुन्या सवयींकडे वळलो हे जाणवेल. आजच्या धकाधकीच्या युगात आयुष्याची वृद्धी होण्यासाठी आरोग्य संपन्न राहण्याची गरज आहे. ताण-तणावापासून दूर राहण्याची गरज आहे, असे असताना आपण स्पर्धेत धावतोय यामुळे ङळषश थींङ्म इरश्ररपलश ढासळलाय याचा थेट परिणाम आपल्या जीवनशैलीवर आणि पर्यायाने आरोग्यावर झालेला आहे. मोबाईलवर आरोग्यदायी पावलं मोजण्याचा संकल्प प्रत्यक्षात डोळ्यांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या 'रिल्स' बघण्यात कधी बदलला हे कळलच नाही, ही वस्तुस्थिती आहे. 'रिल्स' हा प्रकार तसा मनोरंजक असला तरी बघण्याचे भान आपले आहे. आपण किती काळ त्यासाठी देणार हे आपणच ठरवायच बघणारे मात्र भान हरपून बघत बसतात. रिल्स बनविण्याचे आणि त्यातून पैसा कमावण्याचे वेड अतिशय भयानकःत्यापायी जीव धोक्यात घालणारे आणि जिवाला मुकलेले यांची संख्या दिवसागणीक वाढत आहे. कामाचा ताण कमी व्हावा यासाठी रिल्स बघणे हा उपाय नाही. कामाचा ताण कमी करण्यासाठी कामाचे व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन या दोन महत्वाच्या बाबी आहेत. काम करताना त्यांचा प्राधान्यक्रम ठरविणे ही सर्वात महत्वाची बाब आहे. प्राधान्यक्रम ठरवून कामाला वेळेत पूर्ण करण्याची सवय लावून घेतल्यास कामाचा ताण न येता काम केल्याचे समाधान मिळते. आपण कोणत्या भूमिकेत आहोत आणि त्याची मागणी काय आहे याचा अभ्यास आणि सराव अभिनेते करीत असतात. सराव उत्तम झाल्यास सादरीकरण उत्तम होते. त्याच पद्धतीने कामाचा अभ्यास केला पाहिजे. प्राधान्यक्रमानुसार त्याला वेळ दिल्यास आपण काही कालावधीनंतर तेच काम सहजरित्या कमी वेळात पूर्ण करू शकतो. एकदा यात यश मिळाले की, आपोआप आत्मविश्वास वाढतो आणि कामाप्रती सकारात्मकता देखील वाढते.

Work Life Balance दाखवणारे तक्ते आपणास मोबाईल मध्येच बघायला मिळतील. कोणत्या बाबीसाठी किती वेळ आपण दिला याचा आलेख मोबाईल ठेवतो. या 'सोशल मीडिया' साठीचा काळ अधिक असेल तर आपले कामावरील लक्ष कमी होत आहे हे लक्षात घ्यावे.

कोणतेही तंत्रज्ञान नाण्यासारखे असते याला सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन बाजू असतात. मोबाईलच्या तंत्रज्ञानाने आपले संपर्काचे रुपांतर कार्यवृद्धीत करायला हवे मात्र त्याची दुसरी बाजू ही कामाची गती कमी करणारी आहे. मोबाईल संपर्काचे साधन आहे पण वाहन चालवताना मान वाकडी करून त्यावर संभाषण करण्याची तातडी नक्की आहे का ?, असे करून आपण धोका आमंत्रित करीत आहोत याचीही जाणीव आपण ठेवत नाही. जय आणि विरू चा शोले आजही ताजा आहे. अद्याप त्यात जयचे नाणे दोन्हीकडून 'हेड्स' दाखवते याचा खुलासा शेवटी होतो. आपण मोबाईलचा वापर तसा तर करीत नाही नाही हे या निमित्ताने आपण स्वत:ला विचारण्याची वेळ आता आली आहे. कोरोना नंतरच्या न्यू नॉर्मल मध्ये नोकरी सोडण्याची एक मोठी लाट आयटी क्षेत्रात आली. कारण सर्वांना जगलं पाहिजे याचं भान आलं. मात्र आजही पिढी पुन्हा स्पर्धेत धावायला लागली आहे हे देखील तितकेच खरे आहे. आता सिंहावलोकन करताना नवीन संकल्पांची तयारी देखील करा आणि येत्या नववर्ष दिनी साध्य असा संकल्प कराः करताय ना सुरुवात...!

# लोकांना बदल हवा आहे, पणः!

**लोकांना** बदल हवा आहे, हे आज निर्विवाद सत्य आहे. गावापासून शहरापर्यंत, ग्रामपंचायतीपासून संसदपर्यंत, चहाच्या टपरीपासून सोशल मीडियापर्यंत एकच सूर ऐकू येतो. हे असंच चालणार नाही. भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, अपारदर्शक कारभार, असंवेदनशील प्रशासन, राजकीय दडपशाहीङ्घया सगळ्यांबद्दल असंतोष आहे. लोक बोलतात, टीका करतात, संताप व्यक्त करतात. पण तरीही प्रत्यक्षात बदल घडताना दिसत नाही. इथेच तो पणः! उभा राहतो.

लोकांना बदल हवा आहे, पण बदलाचा अर्थ प्रत्येकासाठी वेगळा आहे. काहींना चेहरा बदल हवा आहे, काहींना पक्ष बदल हवा आहे, तर काहींना केवळ स्वतःवर परिणाम न होणारा बदल हवा आहे. हीच विसंगती बदलाच्या प्रक्रियेला कमकुवत करते. बदल हा नेहमीच कष्टाचा, अस्वस्थ करणारा आणि तडजोड मागणारा असतो. पण बहुतांश लोकांना बदल हवाय तो इतरांसाठी, स्वतःसाठी नाही. ही मानसिकता बदलाच्या मुळावर घाव घालते.



– डॉ. भारत कऱ्हाड,
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

लोक बदल हवाय म्हणतात, पण जबाबदारी घ्यायला तयार नसतात. मतदानाच्या दिवशी उत्साह असतो, पण त्याआधी आणि त्यानंतर नागरिक म्हणून भूमिका निभावण्याची तयारी कमी दिसते. स्थानिक प्रश्नांवर सभा, चर्चा, पाठपुरावा, प्रतिनिधींना जाब विचारणं ही सगळी कामं कंटाळवाणी वाटतात. कोणी तरी करेल ही वृत्ती वाढते. लोकशाहीत ही वृत्ती धोकादायक ठरते, कारण निष्क्रिय नागरिक ही सत्तेसाठी सर्वात सोयीची गोष्ट असते.

बदल हवा आहे, पण पर्याय हवा आहे. अनेकदा लोक सध्याच्या व्यवस्थेवर नाराज असतात, मात्र पर्यायावर त्यांचा विश्वास नसतो. हे गेले तर ते येतील, तेही तसेच असतील हा निराशावादी निष्कर्ष लोकांना स्थिती स्वीकारायला भाग पाडतो. परिणामी बदलाची इच्छा असूनही स्थैर्याला मत दिलं जातं. ही मानसिकता बदलल्याशिवाय लोकशाहीत खरा पर्याय उभा राहत नाही.

लोक बदल हवाय म्हणतात, पण प्रश्न विचारण्याची सवय कमी झाली आहे. भावनिक घोषणांवर, व्यक्तिकेंद्रित राजकारणावर आणि ध्रुवीकरणावर चर्चा होते; पण धोरण, प्रक्रिया, उत्तरदायित्व यावर सातत्याने प्रश्न विचारले जात नाहीत. प्रश्न विचारणारा संशयास्पद ठरवला जातो, तर अंध समर्थन करणारा सुरक्षित वाटतो. अशा वातावरणात बदलाची भाषा दुर्बल होते आणि सत्ता अधिक आत्मविश्वासाने वागते.

बदल हवा आहे, पण तो लगेच हवा आहे. समाजाला तात्काळ परिणाम हवेत. संयम, सातत्य आणि दीर्घकालीन प्रयत्न यांची तयारी कमी आहे. एखादं आंदोलन, एखादी चळवळ, एखादा सोशल मीडिया ट्रेंडङ्घहे सगळं क्षणिक उभारी देतं, पण लगेच परिणाम न दिसल्यावर निराशा येते. लोकशाहीतील बदल मात्र संथ असतो. तो रोजच्या छोट्या कृतीतून घडतो. हा वेग स्वीकारण्याची मानसिकता नसेल, तर बदलाची प्रक्रिया अर्धवटच राहते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे लोक बदल हवाय म्हणतात, पण स्वतः बदलायला तयार नसतात. नियम पाळणं, पारदर्शक वागणं, सोयीसाठी तडजोड न करणं, चुकीला पक्ष न पाहता विरोध करणाऱ्या गोष्टी कठीण असतात. पण व्यवस्था ही आपल्या रोजच्या सवयींतूनच घडत असते. आपणच छोट्या पातळीवर नियम तोडत असू, तर मोठ्या पातळीवर व्यवस्थेकडून नैतिकतेची अपेक्षा करणं विसंगत ठरतं. म्हणूनच लोकांना बदल हवा आहे. ही घोषणा अपुरी आहे. तिच्यासोबत हेही स्पष्ट असायला हवं की बदलासाठी आपण काय देणार आहोतङ्घवेळ, सहभाग, संयम, प्रश्न आणि जबाबदारी. सरकार बदलणं हा बदलाचा एक भाग असू शकतो, पण तो अंतिम टप्पा असतो. त्याआधी समाज बदलतो का, नागरिक बदलतो का, विचारांची दिशा बदलते का?हे प्रश्न अधिक मूलभूत आहेत. लोकांना बदल हवा आहे, हे खरं आहे. पण बदल घडवायचा असेल, तर तो मागण्याआधी तो जगण्याची तयारी हवी. तोपर्यंत 'पणः!' हा शब्द आपल्या लोकशाहीच्या प्रत्येक वाक्यात राहील.

# पीडब्ल्यूडी आणि रचनात्मक ऊर्जा संवर्धन!

**राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवसानिमित्ताने सकाळपासून जनजागृती पोस्ट पहिल्या.. केवळ विजेचे दिवे बंद करण्याची जागृती करून खरच उपयोग होणार आहे? नाही.. ऊर्जासंवर्धन ही जीवनशैली आहे.. विचारशैली आहे.. सार्वजनिक बांधकाम विभागाने यात खऱ्या अर्थाने क्रांती घडवली आहे. त्याचाच वृत्तांत वाचकांसाठी देत आहोत.**

**एकेकाळी** शासकीय इमारती म्हणजे दगड, सिमेंट, कुबट वास आणि पंख्यांच्या आवाजांनी भरलेल्या जागा असे काहीसे चित्र डोळ्यासमोर येते. अत्यंत कमी जागेत, कमी वेळेत आणि कमी संसाधनांच्या उपलब्धतेत पूर्वी शासकीय बांधकामे केली जात. इमारतींचा मानसिकतेवर आणि काम करण्याच्या ऊर्जेवर थेट परिणाम होतो याची जाणीव ठेऊन पीडब्ल्यूडी अभियंत्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून नव्या इमारती उभारण्याचा संकल्प मांडला. कालांतराने राजकिय नेतृत्वाला त्याचे महत्व पटले आणि शासकीय इमारतींचे रूप बदलले.



आज या इमारती श्वास घेऊ लागल्या आहेत. त्यांच्यात हवा खेळते, प्रकाश उतरतो, इमारत तापमान स्वतः सांभाळते आणि नागरिकांना आत पाऊल टाकताच एक सहज, नैसर्गिक सुख जाणवते. ही केवळ वास्तुरचना नाही, ही विचाररचना आहे. मुळात रचना हा इमारतीचा आत्मा असतो. रचनाकार कोणत्या विचारशैलीचा अंगीकार करतो त्यावर बरेच काही अवलंबून असते.

आम्ही आता रचना करताना अशी करतो की वास्तूमध्ये कमीत कमी ऊर्जा खर्च व्हावी आणि शाश्वत विकासाचा ती इमारत भाग बनावी.

**स्वयनियंत्रित तापमान :** महाराष्ट्रासारख्या उष्ण आणि दमट हवेच्या पट्ट्यात माणसाला आराम देण्याचा पहिला मार्ग म्हणजे हवा मोकळी ठेवणे. नवीन शासकीय बांधकामांमध्ये याची काळजी घेतली जाते. खोल्या एकमेकांशी संवाद साधत असल्यासारख्या भासतात. वारा एका दिशेने येतो आणि दुसऱ्या दिशेने बाहेर जातो. उंच छतं, लांब कॉरिडॉर, खिडक्या ज्या उघडल्या की इमारतीचा निसर्गाशी संवाद सुरू होतो. या सर्वांचा एकत्रित परिणाम असा की इमारतीतील तापमान आपोआप काही अंशांनी खाली येते. नागरिकांनाही आणि कर्मचाऱ्यांनाही हा फरक स्पष्ट जाणवतो. एसी व पंखे चालू ठेवण्याची गरजच कमी होते.

हिरवळ हा फक्त सजावटीचा भाग नाही ते इमारतीचा अविभाजित अंग बनले आहे. अंगणातली झाडं, प्रवेशद्वाराजवळ तयार केलेल्या सावलीच्या पट्ट्या, वेटिंग एरियातील झाडांच्या सान्निध्यातली आसनव्यवस्था ही सर्व जागा नागरिकांना आलेल्या ताणातून बाहेर काढतात. सरकारी कामासाठी येणाऱ्या लोकांच्या मनात नेहमीच काही ना काही चिंता, अपेक्षा किंवा गोंधळ असतो. पण इमारतीत प्रवेश करताच हिरवाई दिसली की त्या मनावरचा भार अर्धा होतो, हे विज्ञान समजून तशी रचना करण्यात येते. हिरवाई मुळे भरपूर ऑक्सिजन आणि तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते.

**प्रकाशरचना :** सूर्योदयापासून संध्याकाळपर्यंत इमारतींमध्ये दिवसाचा प्रकाश आत यावा, यासाठी मोठ्या खिडक्या, skylights आणि प्रकाश पोहोचवणारे कोन वापरले जातात. कृत्रिम दिव्यांवर अवलंबून राहणे हा आता अत्यंत मर्यादित काळाचा भाग झाला आहे. कार्यालयात बसणाऱ्यांना हा फरक पहिल्याच दिवशी जाणवतो. कामात शांतपणा येतो, डोळ्यांना त्रास होत नाही, आणि जागा अधिक जिवंत भासते.

**उपकरणांचा वापर कमी करणारी संरचना:** लिफ्ट ही कोणत्याही इमारतीतील सर्वाधिक वीजखाऊ यंत्रणा. परंतु ज्या मजल्यावर काम, त्याच स्तरावर पार्किंग उपलब्ध करून देण्याची रचना केल्याने लिफ्टचा वापर मोठ्या प्रमाणावर कमी होतो. नागरिकांचा वेळही वाचतो आणि इमारतीचा ऊर्जा खर्चही. छोटे, साधे आणि जाणीवपूर्वक घेतलेले निर्णय दूरगामी मोठे परिणाम घडवतात.

Zero Human Error **(शून्य मानवी त्रुटी) साठी ऑटोमेशन :**

ऑटोमेशनची भूमिका ऊर्जा संवर्धनात अत्यंत महत्त्वाची ठरते आहे. इमारतीमध्ये वॉशरूम, कॉरिडॉर, मीटिंग रूम अशा ठिकाणी मोशन सेन्सर बसवले जातात. जिथे माणूस येतो तेथे दिवा आपोआप सुरू होतो, आणि तो निघाला की बंद होतो. यामुळे वीज अपव्यय जवळपास शून्यावर येतो. तंत्रज्ञानाचा हा उपयोग अत्यंत सोपा परंतु ऊर्जा वाचवणारा घटक आहे.

**सौर ऊर्जा व इतर :**

नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून अशा रचनांमध्ये सौर ऊर्जेच्या यंत्रणांसाठी व्यवस्था केलेली असते. असे अनेक घटक आहेत, ज्यांचा उपयोग इमारतींच्या रचनेतच बदल घडवून ऊर्जा संवर्धनासाठी आम्ही करत आहोत. ऊर्जेचे संवर्धन हे PWD अभियंत्याच्या विचारशैलीचाच भाग झाले आहेत. आम्हाला वाटते, ऊर्जा संवर्धन ही सरकारी मोहीम नाही; ती आपली संस्कृती व्हावी, आपली रोजची जीवन पद्धती व्हावी. महाराष्ट्रात उभ्या राहणाऱ्या प्रत्येक नव्या इमारतीत आता हा विचार दिसतो. ही इमारत वर्तमानात नागरिकांना सेवा देत असते, पण त्याच वेळी पृथ्वीचीही काळजी घेत असते – भविष्यातील पिढ्यांसाठी!!!

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त एकच गोष्ट अधोरेखित होते– महाराष्ट्राने दाखवलेली ही दिशा अत्यंत प्रगतीशील आहे. कारण प्रगती म्हणजे केवळ उंच इमारती नव्हे; प्रगती म्हणजे अशा इमारती, ज्या भविष्यासाठी ऊर्जा वाचवतात.. अशा रचना ज्या कर्मचाऱ्यांची ऊर्जा वाढवतात!

**–अतुल चव्हाण**
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर

# जैनगिरी जटवाडा येथे त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक उत्साहात प्रारंभ



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री.१००८ संकटहर पार्श्र्वनाथ दिगबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव उत्साहात प्रारंभ झाला असुन सकाळी ध्वजारोहन होउफ्न अनिता दिलीप छाबडा परिवारा तर्फे करण्यात आले. तर मंडप उदघाटन जगदीश केशरसा साहुजी परिवार तर्फे करण्यात आले. यावेळी प.पु.उपाध्याय विरंजन सागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यश्रीसागरजी महाराज ससंघाची उपस्थिती होती. संपुर्ण महोत्सव हा सुकांता सुमधुर वैशाली पहाडे यांच्य साग्रसीताम ध्ये करण्यात येत आहे. सर्व प्रथम सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक जन्मोत्सव व्रिफ्या, पांडुप शिलेवर अभिषेक, बाल व्रिफ्डा पाळणा आदी कार्यकम संपन्न झाले. दुपारी उपाध्यायश्रींचे प्रवचन झाले. यामध्ये शांतीधारेचा मान विनोद दगडा परिवार यांना मिळाला. व अभिषेक जैन जबलपुर यांना मिळाला तर प्रथम अभिषेकाचा मान चंदादेवी प्रकाश कासलीवाल यांन मिळाला. सुर्दन सौभाग्याचा मान निलीमा काला, मयुरी दिपक सेठी, रफ्पाली ललीत लोहाडे यांना मिळाला तर भगवतांचे प्रथम नयन दृश्य पाहण्याचे सौभाग्य प्रशांत जीवन पाटणी यांना मिळाला. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष विनीत लोहाडे यांनी केले तर प्रास्ताविक महामंत्री प्रमोद पांडे यांनी केले.

यावेळी पंचकल्याणक अध्यक्ष मुकेश साहुजी, कार्याध्यक्ष विजयकुमार पहाडे, सचिव अशोक गंगवाल, विव्रफ्म साहुजी, प्रकाश कासलीवाल, दिलीप सेठी, जयचंद ठोले, अशोक गंगवाल, वैभव साहुजी यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती. यावेळी उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले की, पैशापेक्षा म णसाला तप,आराधना,साधना यांनी शाश्श्वत सुख समाधान प्राप्त होते. भाग्यवान भाविकांचाम होत्सवात सहभाग होउफ्न सर्व इच्छा आकांक्षा पुर्ण होत असतात. सामाजिक सम रस्ता हा सर्व समाजाच्या एकात्मतेचा पाया आहे. व्यक्ती व समाजाच्या उन्नतीने भारत विकसीत देश म्हणुन शिखरावर पोहचेल हा दिवस दुर नाही. सर्व समाज बांधव परस्परांशी एकरफ्प झाले तर भारत जगाला विश्श्वबंधुत्वाचा मार्ग दाखवेल असेही उपाध्याय विरंजन सागरजी महाराज यांनी उदबोधन करतांना सांगीतले. यावेळी पुष्पादेवी गंगवाल, जितेंद्र पाटणी, ललीतकुमार लोहाडे, अल्कादेवी गंगवाल, आनंद सेठी, संजय टोंग्या परिवार यांच्यासह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती. संपुर्ण कार्यकम हा संदिप जैन प्रतिष्ठाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यावेळी आचार्यश्रींनी पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाची माहिती विशद केली.

## सुशासन सप्ताह पूर्वतयारीः सेवा पुस्तक अद्यावतीकरण


# सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्याच्या सेवा काळाचा आरसा- जिल्हाधिकारी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

अधिकारी असो वा कर्मचारी त्याच्या सेवा कार्यकाळातील सर्व महत्त्वाच्या नोंदी या सेवापुस्तकात ठेवल्या जातात, त्यामुळे अद्यावत राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबद्दल प्रत्येक कर्मचारी अधिकारी यांनी दक्ष असले पाहिजे. सेवा पुस्तक हा कर्मचाऱ्याच्या सेवा काळाचा आरसा असतो,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जिल्ह्यात दि.१९ ते २५ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या पूर्वतयारीचा टप्पा आजपासून सुरु करण्यात आला. त्यात आज सेवापुस्तक नोंदींचे अद्यावतीकरण करण्यात आले. सुशासन सप्ताहात सेवा वितरण सुधारण्यासाठी अर्जांचे निवारण, राज्य पोर्टलवरील सार्वजनिक तक्रारींचे निवारण, सीपी ग्राम्स पोर्टलवरील तक्रारींचे अनावरण, नागरिक सनदचे अद्यावतीकरण, पीजी पोर्टल तक्रारींचे निवारण, सर्वोत्तम प्रशासन पद्धतीचा अवलंब असे विविध टप्पे राबविण्यात येणार आहेत. त्याअंतर्गत आज जिल्ह्यात सेवापुस्तक नोंद अद्यावतीकरण राबविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फ ुलारी तसेच सर्व शाखांचे प्रमुख, आस्थापना विभागाचे कर्मचारी तसेच सर्व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले सेवापुस्तक देऊन त्यात तपासावयाच्या नोंदींची सुची देण्यात आली. त्यानुसार अपूर्ण असलेल्या नोंदी तात्काळ संबंधित आस्थापना कारकुनाकडून अद्यावत करुन घेण्यात आल्या. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण सेवा करत असतांना दैनंदिन व्यापात आपल्या महत्त्वाचे दस्तऐवज असतांना सेवा पुस्तक याकडेच दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. मग ज्यावेळी सेवानिवृत्तीची वेळ जवळ येते त्यावेळी सेवा पुस्तकातील त्रुटी पूर्ण करण्यासाठी धावाधाव होते. त्याकरीता आपले आरोग्य आणि सेवा पुस्तक याबाबत नेहमी दक्ष असले पाहिजे. या अद्यावतीकरणानंतर सर्वांचे सेवापुस्तक हे ऑनलाईन उपलब्ध करण्यात येतील,असेही त्यांनी सांगितले.



### १०७७ जणांचे सेवापुस्तक होणार अद्यावत

जिल्ह्यात मुख्यालयी आणि तालुकापातळीवर आज ही मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यात अपर जिल्हाधिकरी एक, उपजिल्हाधिकारी १४, तहसिलदार १२, लेखाधिकारी २, लघुलेखक १ असे गट अ चे ३०, गट ब चे नायब तहसिलदार ४३, सहायक लेखाधिकारी १, उपलेखापाल १ असे ४६, गट ब अराजपत्रित लघुलेखक ५, गट क मधील अव्वल कारकून १७२, मंडळ अधिकारी ८५, महसूल सहायक १४४, तलाठी ४७३, वाहन चालक १४ असे एकून ८८८ आणि शिपाई १०८ असे एकूण १०७७ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाचे अद्यावतीकरण या अभियानात केले जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी दिली.

# देवगिरी महाविद्यालयात बी.बी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी योग प्राणायाम व तणाव मुक्त जीवन या विषयावर व्याख्यान संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय व्यवस्थापन शास्त्र विभागातील बीबीएच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०९/१२/२०२५ 'योग प्राणायाम व तणाव मुक्त जीवन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म हाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते होते तर प्रमुख वक्ते योग प्रशिक्षक श्री. पार्थ शिंदे होते. प्रमुख उपस्थिती वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. आर.बी.लहाने होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीबीए व बीसीए समन्वयक डॉ. प्रणिता चिटणीस यांनी केले. विद्यार्थ्यांना तणाव मुक्त आनंदी जीवन जगता यावे त्यांनी महाविद्यालयातील अभ्यासक्रम व अभ्यासक्रमेतर उपक्रम ांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे तसेच त्यांचा संयम वाढावा जे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे या उद्देशाने या कार्यक्रमाचे व नियमित योगासने व प्राणायाम वर्गाचे व्यवस्थापन शास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले असे त्यांनी सांगितले.



वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. आर बी. लहाने यांनी योग म्हणजे जीवनशैली असून मार्क्ससाठी नाही तर तुमच्यासाठी त्याचा अंगीकार करावा व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी नियमित योगासने व प्राणायाम करावे असे सांगितले.

प्रमुख वक्ते व योग प्रशिक्षक श्री. पार्थ शिंदे यांनी योगसने व प्राणायाम याचा आपल्या जीवनावर कसा सकारात्मक परिणाम होतो व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी योगासने व प्राणायाम किती महत्त्वाचे आहे हे उदाहरणासहित स्पष्ट केले. वर्तमानात राहिल्याने तणावमुक्त जीवन जगणे शक्य होते व योग म्हणजे वर्तमानात जगणे होय असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म हाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांनी आपल्या अध्यक्षीय सम ारोपात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी स्वसंवाद वाढवावा व आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात स्वतः च्या शैक्षणिक व भौतिक प्रगतीबरोबरच शारीरिक क्षमता वाढवावी व निरोगी जीवनासाठी नियमित स्वतःला वेळ देऊन योगासन प्राणायाम करावे असे प्रतिपादन केले. या व्याख्यानास बीबीए चे ७५ विद्यार्थी उपस्थित होते.

# देवगिरी महाविद्यालयाच्या भूगर्भशास्त्र विभागातील १८ विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या विभागात कनिष्ठ भूवैज्ञानिक म्हणून निवड

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक ११२/२०२२ परीक्षेत अंतिम निकाल दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

या परिक्षेत देवगिरी महाविद्यालयाच्या भूगर्भशास्त्र विभागातील डॉ. संदिप सिरसाट, डॉ. विश्रांती कदम, श्री. विश्वजीत पाऊलबुद्धे, श्री. शुभम पवळ, श्रीमती. कल्याणी जायभार, श्री. संदिप नव्हेरकर, श्री. शुभम मोरे, श्री. शुभम तिप्पट, श्री. क्षितिज सोनटक्के, श्री. गौरव कुकडे, श्री. तुकाराम कोरडे, श्री. योगेश थोरात, श्री. श्रीहरी तारफे, श्री. शहाजी काशटे कुमारी. भारती खंदारे, कुमारी. वेदीका मोरे, श्री. शेखर मोरे आणि श्री. विशाल गाडगे या विद्यार्थ्यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक म्हणून निवड झाल्याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळांचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, डॉ.गणेश मोहिते, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. रंजना गावंडे, भूगर्भशास्त्र विभागातील प्रा. सुरेन कांबळे, इरशाद कुरेशी, गणेश नलावडे, गौरी नरसापूर व संस्कृती बोबडे यांनी अभिनंदन केले आहे.

# शेतीवाटणीच्या वादातून शेतकऱ्याची आत्महत्या ; दोघांना अटींसह अंतरिम अटकपूर्व जामीन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शेतीच्या वाटणीवरून तब्बल १६ वर्षे सुरू असलेल्या वादाचा थरारक शेवट एका तरुण शेतकऱ्याच्या आत्म हत्येत झाला. या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखालील सुखदेव नामदेव सुर्यवंशी आणि प्रविण सुखदेव सुर्यवंशी या दोघांना वैजापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एल. जी. पच्छे यांनी प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यासह अटी–शर्तीवर अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

सोमनाथ अर्जुन सुर्यवंशी (२९, रा. शिवूर) या तरुण शेतकऱ्याने २२ नोव्हेंबर रोजी विषारी औषध प्राशन केले होते. उपचार सुरू असताना २५ नोव्हेंबर रोजी पहाटे त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी सोमनाथची पत्नी रुपाली सुर्यवंशी यांनी शिऊर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सासरच्या नातेवाईकांकडून सतत धमक्या देऊन मानसिक छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी फिर्यादीत केला आहे.

दीपावलीतील कुटुंबीय बैठकीत तसेच २२ नोव्हेंबर रोजी शिवूर बंगल्याजवळ झालेल्या भेटीत शेतीचा हिस्सा देणार नाही, रस्ता देणार नाही अशा स्वरूपाच्या धमक्या आरोपींनी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. २२ नोव्हेंबरच्या रात्री सोमनाथने नणंदेला फोन करून मी औषध पिलं आहे, असे सांगितल्यानंतर कुटुंबीयांना संशय आला. त्यानंतर तो शेतात विषप्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आला. तीन दिवस उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक होऊ नये म्हणून आरोपींनी ॲड. करण तुपे यांच्या माध्यमातून सत्र न्यायालयात अटकपूर्व जामि नासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने त्यांना अटींसह अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

# जनआक्रोश मोर्चाची दखल घेत पोलीस प्रशासन ॲक्टिव्ह; अवैध नशा व्यवसायांवर मोठी कारवाई, मोर्चा तात्पुरता स्थगित

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रभाग क्रमांक ३ अंतर्गत भिमनगर, भावसिंगपुरा व परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू, गांजा, बटन तसेच इतर अमली पदार्थांच्या विक्रीविरोधात शिवसेना मध्य विभागप्रमुख ॲड. बाबा भाऊ तायडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणाऱ्या जनआक्रोश मोर्चाची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन ॲक्टिव्ह मोडवर आले असून परिसरात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून परिसरात अवैध नशेच्या विक्रीमुळे गुन्हेगारी वाढत होती. याचा परिणाम शाळकरी व महाविद्यालयीन मुली, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यावर होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही दारूबंदी विभाग (राज्य उत्पादन शुल्क) व अन्न व औषध प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता.

या सर्व गंभीर परिस्थितीमुळे मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रदीपजी जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली व ॲड. बाबा भाऊ तायडे यांच्या पुढाकाराने जनआक्रोश मोर्चाची तयारी मागील १५



दिवसांपासून सुरू होती. या मोर्चात सुमारे १० हजार माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक व युवक सहभागी होणार होते.

दरम्यान, पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी स्वतः या मोर्चाची दखल घेत पोलीस प्रशासनाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

त्यानुसार परिसरातील अवैध दारू, गांजा व अम ली पदार्थ विक्री करणारे धंदे मोठ्या प्रमाणावर उध्वस्त करण्यात आले. रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर बेड्या ठोकून कारवाई करण्यात आली असून उघड्यावर दारू पिणाऱ्या नशेखोर व टवाळखोरांवरही कठोर कारवाई करण्यात येत आहे. तसेच परिसरात पोलीस गस्त म ोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे.

या प्रभावी कारवायांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलीस आयुक्तांनी यापुढे कोणतेही अवैध दारू व्यवसाय व गुन्हेगारांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, अशी ठाम हमी दिल्यामुळे सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी निघणारा जनआक्रोश मोर्चा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय ॲड. बाबा भाऊ तायडे यांनी जाहीर केला आहे.

यावेळी ॲड. तायडे यांनी परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर व्हावे यासाठी गृह विभागाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. तसेच गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सातत्यपूर्ण पोलीस गस्त ठेवणे, तसेच गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्यांनाही सहआरोपी करण्याची मागणी केली आहे.

महिला सुरक्षा, नशामुक्त व भयमुक्त परिसरासाठी नागरिकांनी जागरूक राहावे, असे आवाहन करत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अन्याय सहन करणारा देखील गुन्हेगार असतो. या विचारांचा उल्लेख ॲड. तायडे यांनी केला. जनआक्रोश मोर्चासाठी पाठिंबा दिलेल्या सर्व माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक, युवक व सुजाण नागरिकांचे त्यांनी मनः पूर्वक आभार मानले.

### अवैध दारू व्यवसाय व गुन्हेगारांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही

**पोलीस** आयुक्त प्रवीण पवार यांनी स्वतः या मोर्चाची दखल घेत पोलीस प्रशासनाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार परिसरातील



अवैध दारू, गांजा व अमली पदार्थ विक्री करणारे धंदे मोठ्या प्रमाणावर उध्वस्त करण्यात आले. रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर बेड्या ठोकून कारवाई करण्यात आली असून उघड्यावर दारू पिणाऱ्या नशेखोर व टवाळखोरांवरही कठोर कारवाई करण्यात येत आहे. तसेच परिसरात पोलीस गस्त मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे या प्रभावी कारवायांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस आयुक्तांनी यापुढे कोणतेही अवैध दारू व्यवसाय व गुन्हेगारांची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही.

**डॉ. विवेक जाधव, छावणी प्रभारी पोलिस निरीक्षक**

## जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीची बैठक भटक्या श्वानांना द्यावयाच्या आश्रय, खाद्य, वैद्यकीय उपचार सुविधांसाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा- जिल्हाधिकारी स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असून त्याअनुषंगाने आपापल्या कार्यक्षेत्रातील भटक्या श्वानांना आश्रय, निवारा, तसेच खाद्य देण्याच्या जागा निश्चित करा, त्यांचे निर्बिजीकरण करुन वैद्यकीय उपचार सुविधा देण्याच्या व्यवस्था निर्माण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राबवा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सहा. आयुक्त पशुसंवर्धनडॉ. रमण इंगळे, जिल्हा उपायक्त पशुसंवर्धन डॉ. नानासाहेब कदम आदी यावेळी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयातने भटक्या श्वानांच्या बाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिले असून त्यानुसार भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंत निर्मूलन करणे, त्यांच्यासाठी आश्रय, निवाऱ्याची सोय करणे, त्यांना खाण्यासाठी ठिकाण निश्चित करुन तेथेच खाद्य उपलब्ध करुन देणे व इतर मोकळ्या ठिकाणी खायला देणाऱ्या विरुद्ध दंडात्मक कारवाई करणे, भटक्या श्वानांबाबत नागरिकांच्या तक्रारींकरीता हेल्पलाईन क्रमांक विकसीत करणे, तक्रारींचे निराकरण लवकरात लवकर करणे, सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारावे, तसेच सार्वजनिक रुग्णालयात अँटी रेबीज लस तसेच इम्युनोग्लोबुलिनचा साठा अनिवार्य करावा. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांनी यानिर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत समन्वय अधिकारी म्हणून नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बसस्थानके, क्रीडा संकूल अशा सार्वजनिक ठिकाणी आढळणाऱ्या भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करणे,लसीकरण करणे, लसीकरणानंतर नियुक्त निवाऱ्यात हलविणे अशा प्रकारे व्यवस्था करावयाचे आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, या उपाययोजना करण्यासंदर्भात सर्व नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका यांनी कालबद्ध कार्यक्रम राबवावा. भटक्या कुत्र्यांचे आश्रय, निवारे यांची माहिती जाहीर करा. तसेच त्यांचे खाद्य द्यावयाचे ठिकाणही जाहीर करा. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. हेल्पलाईन क्रमांक विकसीत करुन तो ही नागरिकांसाठी जाहीर करावा,असे निर्देश दिले.

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि. २९ डिसेंबर पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## पटेल स्किन केयर रूग्णालयाचे सरदार पटेल यांच्या हस्ते उद्घाटन



अंधारी ता. सिल्लोड येथे पटेल स्किन केयर रूग्णालयाचे सरदार पटेल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी शाकेर पटेल, डॉ. आसमा शाकेर पटेल, साबेर पटेल, युसुफ पटेल, सद्दाम पटेल, जाबेर पटेल यांच्या उपस्थिती होती.

## विकासासाठी भाजप हाच योग्य पर्याय-किशोर शितोळे

### राहुल चाबुकस्वार व कोमल तरंगे यांचेही कौतुक





**दिनेश परदेशी (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रभाग क्रमांक २९ येथे सिनेअभिनेता रमेश परळीकर प्रस्तुत होम मिनिस्टर वहिनी जोमात बाकी कोमात हा कार्यक्रम नाथ व्हॅली शाळेसमोरील मैदान कांचनवाडी सातारा रोड छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन शहर जिल्हाध्यक्ष भाजपा छत्रपती संभाजीनगर अध्यक्ष, देवगिरी बँक प्रदेश प्रवक्ता, किशोर शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विकासासाठी भाजपा हाच योग्य पर्याय असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. तसेच राहुल चाबुकस्वार व कोमल तरंगे यांचेही कौतुक त्यांनी केले.

होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन राहुल साहेबराव चाबुकस्वार व सौभाग्यवती कोमल सारंग तरंगे तसेच भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर सातारा गाव परिसर नक्षत्रवाडी कांचनवाडी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला होता. होम मिनिस्टर कार्यक्रमातील विजेत्यांना प्रथम बक्षीस म्हणून इलेक्ट्रॉनिक बाईक द्वितीय बक्षीस फ्रिज तृतीय बक्षिस श्रशव टिव्ही, चतुर्थी बक्षिस वाशिंग मशीन, पाचवे बक्षीस ओव्हन सहावे बक्षीस १० मिक्सर व सातवे बक्षीस दहा इस्त्री तसेच ५१ पैठणी व १०१ आकर्षक बक्षिसे ही यावेळी आयोजकांमार्फत देण्यात आली.

कार्यक्रमाचे सुंदर नियोजन तसेच सादरकर्ते सिने अभिनेता रमेश परळीकर तसेच त्यांचा वाद्य वृंद समूह यांच्यामुळे कार्यक्रमात वेगळीच रंगत आल्याची महिलांनी सांगितले तसेच राहुल भाऊ व कोमल ताई निवडून आल्यास पुन्हा एकदा असाच कार्यक्रम ठेवावा असेही महिलांनी आवर्जून सांगितले. महाराष्ट्राचे नामांकित होम मिनिस्टर हा कार्यक्रम उत्तमरीत्या आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे महिलांमार्फत विशेष अभिनंदन ही यावेळी करण्यात आले

राहुल चाबुकस्वार यांनी नागरिकांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या तसेच महानगरपालिकेत जाताच सर्व सोयी सुविधा व नागरिकांना जो सध्या त्रास होत आहे तो त्रास कमी करण्याचा प्रयत्न माझ्या मार्फत होईल तसेच प्रभाग क्रमांक २९ मधील इतर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार ही विकासाच्या कामात कुठेही मागे पुढे पाहणार नाहीत असे राहुल भाऊ यांनी सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199